PDCC BANK

# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

मुख्य कचेरी : ४ ब, बी.जे. रोड, पुणे - ४११००१.

✲ पो. बॉक्स नं.१०९ ✲ दुरध्वनी क्र.: २६१३३८३३, २६१३३३००. ई-मेल: punedcc@gmail.com

## निविदा – सूचना

**मोहोरबंद निविदा दि.२९.०३.२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत प्रशासन विभाग मुख्यकचेरी येथे स्विकारण्यात येतील. त्यानंतर येणाऱ्या निविदांचा विचार केला जाणार नाही.**

बँकेस खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे करार पध्दतीवर तीन वर्षाकरीता कुरिअर सेवा पुरविणेकामी नोंदणीकृत मान्यताप्राप्त व बँकींग अस्थापनास कुरिअर सेवा पुरविण्याचा विशेष अनुभवी एजन्सीकडून मोहोरबंद निविदा (दरपत्रके) मागविण्यात येत आहेत. बँकेच्या पुणे जिल्ह्यात एकूण २९० शाखा ४ विस्तारित कक्ष, १५ झोनल ऑफिस व मुख्य कार्यालय इ. कार्यरत आहेत. सेवांचा तपशिल खालीलप्रमाणे...

कुरिअर सेवा पुरविणाऱ्या संस्था तालुकानिहाय स्वतंत्र निविदा दाखल करू शकतात.

### अ) बँकेच्या मुख्यकचेरी व शाखांकरीता करावयाच्या कुरिअर सेवेचे स्वरुप.

१) बँकेच्या मुख्यकचेरी व शाखांकडील दैनंदिन क्लिअरिंग व टपाल ने–आण करणे. बँकेच्या मुख्यकचेरीकडून शाखांना व शाखेकडून मुख्यकचेरीकडे करावयाच्या कुरिअर सेवेकरीता दरमहा प्रती शाखा सर्व करासह सेवाशुल्क निश्चित करण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर बँका व अन्य ठिकाणी रजिस्टर टपाल व साधे टपाल यांचा ही समावेश असेल. बँकेच्या पुणे जिल्ह्यात एकूण २९० शाखा ४ विस्तारित कक्ष, १५ झोनल ऑफिस व मुख्य कार्यालय इ. ठिकाणी दैनंदिन कुरिअरची सेवा बँकेने निश्चित केलेल्या अटी शर्तीनुसार पूर्ण करावी लागेल.

२) कुरिअर सेवा पुरविणाऱ्या संस्था तालुकानिहाय पातळीवर स्वतंत्र निविदा दाखल करु शकतात. सदर तालुक्यांचा शाखानिहाय तपशिल पुढीलप्रमाणे...

| तालुक्याचे नाव | आंबेगाव | बारामती | भोर | दौंड | हवेली | इंदापूर | जुन्नर | खेड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शाखा + वि.कक्ष संख्या | १८ | ३१+१ | ११ | २९+१ | २५ | ३० | २० | १८ |
| तालुक्याचे नाव | मावळ | मुळशी | पुणे पिंपरी चिंचवड | पुणे शहर | पुरंदर | शिरुर | वेल्हा | |
| शाखा + वि.कक्ष संख्या | १२ | १२ | १९ | १८+१ | १३ | २८ | ६+१ | |

३) बँकेच्या मुख्यकचेरीकडील क्लिअरिंग रिटर्न, ई.सी.एस.क्लिअरिंग व टपाल तसेच इतर सिलबंद पाकीटे, चेक्स्, डी.डी. चेकबुक यांचे दैनंदिन व नियमित विशेष जबाबदारीने वेळचेवेळी शाखेकडे/शाखेकडून पोहोच करणे आवश्यक आहे.

४) दैनंदिन कुरिअर सेवा रोजच्या रोज नियमितपणे शाखेस न मिळाल्यास पूर्ण सेवाशुल्क मिळण्यास आपण पात्र राहणार नाही.

५) क्लिअरिंग रिटर्न, ई.सी.एस.क्लिअरिंग व टपाल तसेच इतर सिलबंद पाकिटे, चेक्स्, डी.डी. चेकबुक या टपालांच्या सुरक्षिततेसाठी विमा उतरविण्याची, सर्व प्रकारचे कायदेशीर कर/टॅक्स भरण्याची व कुरिअर सेवेचे कामकाज करण्याऱ्या व्यक्तीची/इसमाची जबाबदारी नियुक्त कुरिअर संस्थेची राहील.

६) कुरिअर सेवेकरीता नियुक्त केलेल्या संस्थेच्या मुख्यकचेरी व शाखांकरीता सिलबंद पाकीट व दैनंदिन क्लिअरिंग रिटर्न चेक्स्, डी.डी. चेकबुक अंशतः/पूर्णतः हरविल्यास, गहाळ झाल्यास/चोरी गेल्यास व अन्यत्र पोहोच केले, विलंबनाने मिळाले, अगर तत्सम प्रकारच्या कारणामुळे बँकेचे सभासद व खातेदार यांचे काही आर्थिक नुकसान झाल्यास तसेच खातेदाराने व्याजाची मागणी केल्यास/कोर्ट केसेस कायदेशीर बाबी निर्माण झाल्यास त्याची नुकसान भरपाई/निराकरण करुन देण्याची जबाबदारी सदर कुरिअर सेवेकरीता नियुक्त केलेल्या एजन्सी/संस्थेची राहील.

**ब) बँकेच्या शाखांकरीता कुरिअर सेवा व्यवस्था करणेबाबतच्या संस्थेची आवश्यक कागदपत्रे व माहिती.**

१. सदर कुरिअर एजन्सी/फर्म शासनाचे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवयश्क आहे. (शॉप ॲक्ट लायसन्स)

२. पॅन कार्ड व आधारकार्ड असणे आवश्यक आहे. (संस्थेचे प्रोपायटर)

३. जीएसटी रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे.

४. बँक अस्थापनास कुरिअर सेवा पुरविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

५. सदर निविदेमध्ये कुरिअर सेवा पुरविण्याचे सर्व समाविष्ट दर/शुल्क (सर्व करासह) नमूद असावेत. (क्लिअरिंग, साधे टपाल, रजिस्टर्ड टपाल इ. किंवा एकत्रित मासिक शुल्क)

६. सिलबंद दरपत्रके/निविदा बँकेच्या प्रशासन विभागाकडे दि.२९.०३.२०२३ पर्यंत दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

७. सदर संस्थेला बँकींग अस्थापनास सेवा पुरविण्याचा विशेष अनुभव विचारात घेऊन व पुणे जिल्हयातील भौगोलीक परिस्थितीनुसार संस्थांची निवड केली जाईल.

८. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार बँकेचा राहील. तसेच सर्व अगर कोणतेही कारण न देता दरपत्रक नाकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे.

९. बँकेने संमत केलेल्या विविध नमुन्यात करार करणे बंधनकारक राहील.

१०. कुरिअर सेवेची बँकेस नियुक्ती झालेनंतर विभागानुसार बँकेने निश्चित केलेली रक्कम सुरक्षा ठेव म्हणून बँकेत जमा करणे बंधनकारक राहील. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

११. वरील अटी व शर्तीमध्ये वाढ/कमी/दुरुस्त करण्याचा अथवा संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे.

**(स्वाक्षरी)**
**अनिरुद्ध य. देसाई**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**